# शिक्षण, विकास आणि लोकाभिमुख राज्यकारभाराच्या क्षेत्रात नव्या करिअरची संधी देणारे अझीम प्रेमजी विद्यापीठ

आपल्या देशात स्वातंत्र्योत्तर काळात एकूणच शिक्षणाचा आणि विशेष करून प्राथमिक शिक्षणाचा सर्वांगीण विचार करण्यासाठी आणि त्याचा देशभर प्रसार करण्यासाठी स्थापन झालेल्या 'कोठारी कमिशन' चा अहवाल केंद्र सरकारला सादर करण्याच्या घटनेला या वर्षी म्हणजेच २९ जून २०१६ रोजी ५० वर्षे पूर्ण होत आहेत. या निमित्ताने, आजच्या बदलत्या परिस्थितीत आणि जागतिकीकरणाच्या संदर्भात पुढील काळातील आव्हानांचे वेध घेणे, तसेच भारतातील एकंदर शिक्षणक्षेत्राचा दर्जा, व्याप्ती आणि शिक्षणपद्धतीमध्ये (सिस्टीम) सुयोग्य बदल करणे क्रमप्राप्त बनले आहे.

आजच्या 'परीक्षाकेंद्री' शिक्षणपद्धतीमध्ये दूरगामी बदल घडवायचे असतील तर शासनाच्या शिक्षणविभागाला बरोबर घेतल्याशिवाय हे बदल टिकू शकणार नाहीत आणि ते सर्वव्यापी होऊ शकणार नाहीत हे तितकेच खरे, त्यादृष्टीने अझीम प्रेमजी फाऊण्डेशन मागील चौदा वर्षांपासून कर्नाटक, मध्यप्रदेश, छत्तीसगढ, आंध्रप्रदेश, पाँडिचेरी, राजस्थान, उत्तराखंड आणि बिहार या आठ राज्यांच्या शिक्षण विभागाच्या खांद्याला खांदा लावून कार्य करीत आहे. मात्र हे करीत असताना, फक्त प्राथमिक शिक्षण (पहिली ते पांचवी) केंद्रस्थानी ठेऊन अझीम प्रेमजी फाऊण्डेशन हे शिक्षण विभागाच्या सहकार्य व सहभागातून प्राथमिक शिक्षणाचा पाया समृद्ध करण्याचे कार्य साडेतीन लाख शासकीय शाळांमधून अविरतपणे करत आहे. त्याअनुषंगाने गुणवत्ताप्रधान धोरण आखणे, त्या अनुरूप शिक्षकांना सर्वकष प्रशिक्षण देणे, भोवतालशी नाते जोडणारे गतिशील अभ्यासक्रम तयार करणे आणि देशातील शिक्षणक्षेत्रात आधुनिक व्यवस्थापन निर्माण करण्याच्या दिशेने फाउण्डेशन विशेष प्रयत्नशील आहे.




### अझीम प्रेमजी विद्यापीठाची स्थापना

अझीम प्रेमजी फाउण्डेशनच्या वतीने सुरु केलेल्या कार्यानुभवाचे संचित पद्धतशीरपणे नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याच्या कटिबद्धतेतून २०१० साली फाउण्डेशनने अझीम प्रेमजी विद्यापीठाची स्थापना केली. हे पाऊल उचलताना, 'शिक्षण आणि विकासाच्या' दोन मूलभूत क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर सक्षम व संवेदनशील व्यावसायिक (प्रोफेशनल्स) तयार करणे तितकेच महत्वाचे आणि गरजेचे आहे. केवळ शिक्षकांवर अवलंबून राहून चालणार नाही. कारण हे शिक्षक देखील प्रचलित शिक्षणपद्धतीतून तयार होतात, याबाबत वरील मंडळींमध्ये वैचारिक स्पष्टता देखील होती. म्हणूनच अझीम प्रेमजी फाउण्डेशनच्या वतीने २०११ साली बंगळुरू येथे सामाजिक विकासाला पूर्णपणे वाहिलेले कर्नाटकातील पहिले वहिले खाजगी आणि स्वतंत्र विद्यापीठ सुरु केले. राष्ट्रीय विद्यापीठ आयोगाने (University Grants Commission) २२ एफ कलमान्वये अझीम प्रेमजी विद्यापीठाला आणि त्यातील विविध अभ्यासक्रमांना अधिकृत मान्यताही दिली.

प्रारंभी, अझीम प्रेमजी विद्यापीठाने मास्टर्स ऑफ आर्टस (एम.ए.) इन एज्युकेशन, मास्टर्स ऑफ आर्टस (एम.ए.) इन डेव्हलपमेंट आणि मास्टर्स ऑफ आर्टस (एम.ए.) इन पब्लिक पॉलिसी ॲन्ड गवर्नन्स हे दोन वर्षांच्या कालावधीचे लक्षणीय पदव्युत्तर निवासी (रेसिडेन्शिअल) शिक्षणक्रम सुरु केले आहेत.

## विविध सामाजिक प्रश्नांबाबत प्रत्यक्षानुभव देणारा अभ्यासक्रम

वरील शिक्षणक्रमांमधून, अभ्यासक्रम, अध्यापनशास्त्र व अध्यापन पद्धती (Curriculum & Pedagogy) पूर्व प्राथमिक शिक्षण (Early Childhood Education), शैक्षणिक संस्था, नेतृत्व आणि व्यवस्थापन (School Organization, Leadership & Management), आरोग्य आणि समतोल आहार (Health & Nutrition), कायदा आणि राज्य/प्रशासकीय कारभार (Law & Governance), उपजीविका (Livelihood), सार्वजनिक धोरणे (Public Policy), पर्यावरण (Environment), चिरंजीवी विकास (Sustainable Development) यासारख्या अनेक समाजोपयोगी विषयांचा विशेष अभ्यास करणे विद्यार्थ्यांना शक्य होणार आहे. वर्गातील शिक्षणाबरोबरच देशभर पसरलेल्या विविध समाजघटक व सेवाभावी संस्थांमध्ये जाऊन प्रत्यक्ष कामाचा अनुभव घेण्यावर विद्यापीठाने प्राधान्याने मोठ्या प्रमाणावर भर दिला आहे.

पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या २०१६-२०१८ या वर्षासाठीची प्रवेश-प्रक्रिया सुरू झाली असून, त्यासाठी कोणत्याही शिक्षणशाखेचे किमान पदवीधर असलेले विद्यार्थी आणि व्यावसायिकांना **२८ जानेवारी २०१६** पूर्वी आपले अर्ज सादर करावे लागतील, त्यासाठी इच्छुकांनी http:/www.azimpremjiuniversity.edu.in/SitePages/admissions-programme-pg-application-process.aspx या संकेतस्थळावर संपर्क साधावा.

## प्रवेशपूर्व लेखी परीक्षा व मुलाखत

एम.ए.च्या अभ्यासक्रमात प्रवेश घेण्याकरिता विद्यापीठाच्या वतीने **रविवार १४ फेब्रुवारी २०१६** रोजी देशभरातील पस्तीसहून अधिक केन्द्रांमधून प्रवेशपूर्व लेखी परीक्षा घेण्यात येणार आहे. कोणत्याही शाखेतील पदवीधर असलेल्या (graduate degree) आणि यावर्षी कोणत्याही पदवी-परीक्षेच्या शेवटच्या वर्षाच्या परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांना देखील अर्ज करता येईल. लेखी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्यांना प्रत्यक्ष मुलाखतीसाठी बोलविण्यात येईल आणि त्यानंतरच विद्यार्थ्यांची अंतिम निवड केली जाईल.

## बारावीनंतरचे पदवी अभ्यासक्रम - (बी.ए., बी.एस्सी.)

जुलै २०१५ पासून देशभरातील विद्यार्थ्यांना बारावीनंतर बी.ए. आणि बीएस्सी. हे दोन निवासी शिक्षणक्रम उपलब्ध करून देण्यात आले आहेत. कोणत्याही शाखेतून बारावी उत्तीर्ण असलेल्या (मार्च २०१६ मध्ये बारावीच्या परीक्षेस बसणाऱ्या विद्यार्थ्यांना देखील) या शिक्षणक्रमास प्रवेश घेण्यासाठीच्या प्रवेश-प्रक्रियेत सहभागी होता येईल.

आंतरराष्ट्रीय स्तरावर सर्वमान्य असलेल्या श्रेयांक प्रणालीवर (क्रेडिट सिस्टिम) आधारित सदर शिक्षणक्रमात, मानव्यशास्त्र (ह्युमॅनिटीज) विभागात इतिहास, साहित्य आणि तत्वज्ञान (फिलॉसॉफी), सामाजिकशास्त्र विभागात अर्थशास्त्र (इकॉनॉमिक्स) व राज्यशास्त्र (पॉलिटिक्स) आणि विज्ञानशास्त्र (सायन्सेस) विभागात पदार्थविज्ञान (फिजिक्स) व जीवशास्त्र (बायॉलॉजी) या विषयांमध्ये विशेषत्व (स्पेशलायजेशन) प्राप्त करणे विद्यार्थ्यांना शक्य होणार आहे. विशेष महत्वाचे म्हणजे विद्यार्थ्यांना आपल्या निवडीच्या विषयांवर संशोधन वा प्रत्यक्ष कामावर आधारित प्रकल्प हाती घेऊन विशेष प्राविण्यासह (ऑनर्स) पदवी प्राप्त करता येईल. बी.ए. आणि बीएस्सी. शिक्षणक्रमाला प्रवेश घेतलेल्या सर्वच विद्यार्थ्यांना, त्यांची चिकित्सक विचारक्षमता (क्रिटिकल थिंकिंग) वृद्धिंगत करणे आणि त्यांचा व्यासंग वाढवून विविध विचार व प्रश्नांवर सखोल चिंतन (रिफ्लेक्शन) करण्याची सवय जडण्यासाठी प्रारंभी सामाईक अभ्यासक्रम (कॉमन कोर्स) करावा लागणार आहे.

बी.ए., बीएस्सी. शिक्षणक्रमांस प्रवेश घेण्यास उत्सुक असणाऱ्यांसाठी ऑनलाईन अर्ज करण्याची मुदत **२५ एप्रिल २०१६** आहे.

## वंचित समाजघटकातील विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती व आर्थिक सहाय्य

ग्रामीण वा शहरी भागातील, शैक्षणिक व आर्थिकदृष्ट्या वंचित गटातील विद्यार्थी-विद्यार्थिनींना विद्यापीठाच्या वतीने अंशतः अथवा पूर्ण शिष्यवृत्ती देण्याची किंवा अल्पशा दराने बँकेचे कर्ज मिळवून देण्याची योजना देखील विद्यापीठाने कार्यान्वित केली आहे. मागील वर्षी एकूण विद्यार्थ्यांपैकी जवळपास ५०% विद्यार्थ्यांना विद्यापीठामार्फत आर्थिक

सहाय्य उपलब्ध करून देण्यात आले. विद्यापीठातील अभ्यासक्रम यशस्वीपणे पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांना विद्यापीठातर्फे शिक्षण व विकासाच्या क्षेत्राप्रमाणेच इतरही क्षेत्रात काम करण्याची संधी उपलब्ध करून देण्याचे (Placements) प्रमाण जवळपास ९०% इतके आहे. त्यापैकी अनेक विद्यार्थ्यांना 'अझीम प्रेमजी फाउण्डेशन' मध्येच पूर्णवेळ काम करण्याची संधी मिळू शकते. तरी, पदवीधर विद्यार्थी तसेच पदवी परीक्षेच्या शेवटच्या वर्षातील विद्यार्थ्यांनी या संधीचा अवश्य लाभ घ्यावा, असे आमचे आवाहन आहे.

**प्रवेश प्रक्रिया समजून घेण्यासाठी**

http://www.azimpremjiuniversity.edu.in/SitePages/admissions-programme-overview.aspx या संकेतस्थळावर सत्वर भेट द्या.

TOLL FREE HELPLINE : 1800 266 2001

**पत्ता** - Azim Premji University, Pixel Park, B Block, PES institute of Technology Campus, Electronic City, Hosur Road (Beside NICE Road). **Bangalore - 560100**

**अधिक माहितीसाठी**

**EMAIL** : admissions@apu.edu.in

**FACEBOOK** : www.facebook.com/azimpremjiuniversity

**WEBSITE**:www.azimpremjiuniversity.edu.in

**YOUTUBE** :

www.youtube.com/AzimPremjiUniversity

**पुणे ऑफिस :**

आनंद, १०८/३६, भारती निवास सोसायटी, प्रभात रोड गल्ली नं. १४, एरंडवणा, पुणे ४११ ००४

मोबाईल ९९२२९ १३६१३

**EMAIL** :

prashant.kothadiya@92impremjifoundation.org

* * *

# व्यापारी वर्गाच्या दृष्टीने जीएसटी कायदा सोपा, सरळ बनविण्यासाठी व्यापारी वर्गाची एकजूट!

सरकारने नेमलेल्या व्यवस्थापन कमिटीने जीएसटी कायद्याचा जो मॉडेल मसूदा प्रकाशित केला आहे त्यामध्ये सुधारणा वगैरे करण्याच्या हेतूने भारतीय उद्योग व्यापार मंडळाची राष्ट्रीय कोर कमिटीची बैठक १० जानेवारीला नवी दिल्ली येथे बीयूबीएमचे राष्ट्रीय अध्यक्ष व माजी भाजपा सांसद सदस्य श्री. श्यामबिहारी मिश्रा यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या बैठकीला अनेक राज्यातून प्रतिनिधी उपस्थित होते. सरकारने याबद्दल मात्र कोणत्याही व्यापारी संघटनेबरोबर संपर्क साधलेला नाही ही दुर्दैवी गोष्ट आहे. सत्तेमध्ये असताना कॉंग्रेस सरकारनेसुद्धा याबाबतीत व्यापारी वर्गाशी संपर्क साधलेला नव्हता.

जीएसटीचा कर दर कमी करणे, तो सरळ व सोपा करणे तसेच व्यापाऱ्यांच्या हिताच्या दृष्टीने तो बनविणे यासाठी सर्वांनी जोरदार आवाजात म्हणणे मांडले. यादृष्टीने वरील संघटनेचे एक मंडळ या मुद्यांवर चर्चा करण्यासाठी पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी व वित्तमंत्री श्री. अरुण जेटली यांची भेट घेणार आहेत.

याप्रसंगी बोलताना श्री. मिश्रा म्हणाले, जीएसटीमुळे भ्रष्टाचारमुक्त व्यापार व सरकारी बाबूंच्या त्रासातून मुक्त असा व्यापार होणे जरूरीचे आहे. यामुळे देशातील शहरी/ग्रामीण तसेच लहान व्यापारी या सर्वांना याचे पालन करणे सुसह्य होईल. जीएसटीच्या सध्याच्या मॉडेल मसुद्यावर व्यापारी सहमत नाहीत असे सांगून यासाठी पुढील मुद्दे विचारार्थ सरकारकडे प्रत्यक्ष भेटीत पाठविण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

(१) वार्षिक विक्री उलाढाल रु. एक कोटी असलेल्यांना जीएसटीतून माफी द्यावी; (२) १ कोटी रु. पेक्षा अधिक उलाढाल असलेल्या व्यापाऱ्यांसाठी स्लॅब बनवून त्याप्रमाणे परवाना फी च्या रूपात ५,०००, १०,०००, १५,०००, २०,००० आणि २५,००० रु. आकारून वार्षिक आकारणी करण्यात यावी.; (३) पॅकिंग केलेल्या वस्तूंची विक्री करताना एमआरपीवर जीएसटी लावायचा असा नियम आहे मात्र पॅक वस्तू व्यापाऱ्याला ज्या किंमतीत दिली जाते त्यावर जीएसटी आकारला गेला पाहिजे अशी तरतूद करणेही जरूरीचे आहे.

* * *